# मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत

# आवडता मुलगा गुलाम बनतो




लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus

अनुवादक: Rev. Shilas Gavit

रूपान्तरकार: M. Kerr; Sarah S.


60 गोष्टींतील 7 (पहिली)


**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

इसहाक फार आनंदित होता. कारण त्याचा मुलगा याकोब घरि परतला होता. ऐवढेच नव्हे तर ज्या एसावाने याकोबाला मारण्याचा निश्‍चय केला होता त्याने देखिल त्याचे स्वागत केले. परंतु याकोबाचे मुले आनंदित नव्हते कारण त्यांचा सर्वात लहान भाऊ योसेफ हा वडीलांचा आवडता होता.



1

योसेफाने जेंव्हा त्याचे स्वप्न त्याच्या भावांना सांगितले तेंव्हा तर त्याच्या भावांना त्याचा जास्ती राग आला. "आपण शेतात पेंढ्या बांधीत होतो तो माझी पेंढी उठून उभी राहिली; तेंव्हा तुमच्या पेंढ्या माझ्या पेंढीसभोवती येऊन उभ्या राहिल्या व त्यांनी तिला नमन केले."



2

असे योसेफाने त्यांना सांगितले. या स्वप्नाचा अर्थ असा की योसेफ त्याच्या भावांपेक्षा जास्त महत्वाचा होईल.



3

योसेफाच्या दुसऱ्या स्वप्नात, सूर्य, चंद्र व अकरा तारे यांनी त्याला नमन केले असे दिसले. त्याचे आईवडील व भाऊ यांच्यापेक्षा स्वतःला जास्त महत्व दिल्यामुळे योसेफावर त्याचे वडील देखिल रागावले.



4

एके दिवशी याकोबाने योसेफाला त्याच्या भावांकडे शेतात जेथे ते कळप चारावयास गेले होते तिकडे पाठविले. त्याच्या भावांनी त्याला त्यांच्याकडे येतांना पाहिले. "चला या स्वप्नदर्शीला आपण मारुन टाकू" असे ते आपसांत म्हणाले म्हणाले. योसेफाला त्याच्यासमोरिल धोका माहित नव्हता.



5

त्यांचा मोठा भाऊ रऊबेन हा त्यांच्याशी सहमत नव्हता. तो म्हणाला, "आपण रक्तपात करु नये, पहा येथे एक खड्डा आहे. याला आपण त्यात मरायला टाकून देऊया!" रात्रीच्यावेळी तेथे जाऊन त्याला त्या खड्ड्यातून सोडवावे अशी रऊबेनची योजना होती.



6

योसेफ आपल्या भावांपाशी पोहंचला, तेंव्हा त्याच्या अंगात याकोबाने त्याच्या आवडत्या मुलासाठी खास तयार केलेला रंगेबिरंगी पायघोळ झगा होता तो त्यांनी ओरबाडून काढला. मग त्यांनी त्याला त्या भयाण अशा खड्ड्यात टाकून दिले.



7

रऊबेनच्या अनुपस्थितीत, उंटाचा तांडा त्यांच्याजवळून मिसर देशात जात असलेला त्यांनी पाहिला. तेंव्हा यहुदा आपल्या भावांस म्हणाला, "चला योसेफाला विकून टाकू." सौदा पक्का केला. त्यांनी योसेफाची विस चांदीच्या नाण्यांनी विक्री केली.





8


प्रवाशी उंट त्याला त्याच्या कुटुंबापासून व मातृभूमिपासून दुर
घेऊन जात असतांना घाबरलेला आणि डोळ्यांत अश्रू असलेला
योसेफ, असहाय्यतेने पहात होता.
9


"हा योसेफचाच झगा आहे
काय? हा रक्ताने माखलेला
आहे. आम्हांला तो रानात
मिळाला." त्याचा प्रीय मुलगा
योसेफ याला रानातील हिंस्त्र
पशूंनी मारुन टाकले असावे
यावर त्या क्रूर भावांनी
याकोबाला विश्वास करण्यास
भाग पाडले. याकोबाने आपले
कपडे फाडले व शोक केला.
कोणीही त्याचे सांत्वन करु
शकले नाही.
10


मिसरांत, योसेफ घाबरलेला आणि
एकटाच असा असणार. कदाचित
त्याला घराची आठवण येत असावी.
परंतु आता त्याची तेथून सुटका होऊ
शकत नव्हती. तो मिसरांतील
पोटीफर नावाच्या एका महत्वाच्या
अधिकाऱ्याच्या घरात गुलाम होता.
योसेफ हमेशा मेहनत करुन काम
करतो व तो विश्वास करण्यास
योग्य आहे हे पोटीफरने पाहिले.
11


एके दिवशी पोटीफराने योसेफाला सांगितले
की, "परमेश्वर तुझ्याबरोबर असल्याकारणाने
जे कांहि तूं हाती घेतो त्यास परमेश्वर यश
देतो. म्हणून तू माझ्या घराचा कारभारी व्हावे,
माझा व्यवसाय आणि माझ्या इतर सेवकांचा
प्रमुख व्हावे अशी माझी इच्छा आहे."
12


योसेफामुळे देवाने पोटीफरचे घरदार
व शेतीवाडी या सर्वांचे कल्याण
केले. योसेफ आता एक महत्वाचा
मनुष्य बनला असतांना देखिल तो
देवावर भरोसा करुन विश्वासूपणे
देवाची सेवा करत होता. परंतू
यासेफावर एक संकट आले.
13


पोटीफरची पत्नी दुष्ट होती. तिच्या पतीची जागा योसेफाने घ्यावी असे तिने
योसेफाला सांगितले. योसेफाने तसे करण्यास नकार दिला. पोटीफर विरुध्द्
वागून तो देवाविरुध्द् पाप
करु शकत नव्हता.
14













आवडता मुलगा गुलाम बनतो

परमेश्‍वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

उत्पत्ति ३७, उत्पत्ति ३९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!